पुण्य नगरी
पुणे, शनिवार, दि. ११ जुलै २०२६

# पंढरपूर वारीनिमित्त रविवारी भरतनाट्यम्

**पुणे** : भक्ती, परंपरा, कला व ईश्वर यांच्यातील कालातीत संबंधाचा उत्सव म्हणजे माऊली-एक कालातीत परंपरा आहे. पंढरपूर वारीचा आत्मा जिवंत करणाऱ्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम कलाकार कलाईमामनी बालादेवी चंद्रशेखर यांच्या भरतनाट्यमचा कार्यक्रम पुणेकरांना अनुभवता येणार आहे. हा कार्यक्रम रविवारी (दि. १२) कोथरूड, मयूर कॉलनी येथील एमईएस सभागृहात सायंकाळी ५ ते ६.१५ वाजेपर्यंत होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी कलाईमामनी बालादेवी चंद्रशेखर, फ्युएलच्या विभागप्रमुख प्रा. प्राची अहिरराव आणि चंद्रशेखर उपस्थित होते. डॉ. देशपांडे म्हणाले, शैक्षणिक संस्थेतील १० मुलींच्या शिक्षणाला सहाय्यासाठी हा कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमात संत तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ महाराजांचे विविध अभंग आणि